**सुभाषित :**

प्रीणाति यः सुचरितैः पितरं स पुत्रो यद्भर्तुरेव हितमिच्छति तत् कलत्रम् |
तन्मित्रमापदि सुखे च समक्रियं यदेतत्त्रयं जगति पुण्यकृतो लभन्ते ||

**अर्थ :**

आपल्या सत्कृत्यांनी जो वडलांना आनंदित करतो तोच सुपुत्र. जी आपल्या पतीच्या हिताचीच फक्त इच्छा करते तीच (आदर्श) पत्नी, आपल्या संकटात आणि वैभवाच्या काळी आपल्या भावनांना योग्य असेच ज्याचे आचरण असते, तोच खरा मित्र आणि या तीन गोष्टी फक्त पुण्यवान लोकांनाच प्राप्त होतात.